औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

☎: २३३३५३६-४०, २३४८००१-०५
P.B.X. २३३१२८१, २३३१२८३
Fax : (०२४०) - २३३१२१३

नगर रचना विभाग

रेखांकन क्रमांक I-305/2015
जा.क्र./मनपा/नरवि/ससंनर/२०१५/923 दिनांक 04/8/२०१५

आदेश

श्री. भागाजी नंदराम बकले, श्री. गुणाजी रामसिंग बकले,
श्री. रामदास रामसिंग बगले, श्री. रुपचंद नंदराम बकले,
श्री. गंगाराम भावसिंग बकले, श्री. फुलचंद भावसिंग बकले
गट क्रमांक २६/२ व २६/३
मौजे हिमायतनगर, औरंगाबाद.
द्वारा **श्री. अविनाश बी. पवार** (आर्कि),
जालनारोड, औरंगाबाद.

यांनी **मौजे हिमायतनगर,** औरंगाबाद येथील **गट नंबर २६/२ व २६/३ औरंगाबाद** येथील दाखल रेखांकन प्रस्तावास सोबतच्या नकाशाप्रमाणे खालील अटींवर अंतिम मंजुरी देण्यात येत आहे.

०१. सदर भूखंडाचा वापर निवासी वापरासाठी करण्यात यावा. अन्य कोणताही वापर महानगरपालिकेची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये.

०२. रेखांकनातील प्रत्येक स्वतंत्र भूखंडाचे क्षेत्र २५० चौ.मी. पेक्षा कमी असू नये, सेमी डिटॅच भूखंडाचे क्षेत्र १२५ चौ.मी. पेक्षा कमी असू नये. भूखंडाच्या हद्दीचे दगड हलविण्यात येवू नये

०३. मंजुर केलेल्या रेखांकनातील कोणत्याही भूखंडाची पून्हा पोट विभागणी किंवा एकत्रिकरण करावयाचे झाल्यास महानगरपालिकेची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

०४. रेखांकनामधील खुली जागा विकास नियंत्रण नियमावलीस अधिन राहून कायमची खुली राहील.

०५. श्री. भागाजी नंदराम बकले व इतर यांनी रेखांकनामधील खुली जागा ५७९.०० चौ.मी. क्षेत्र, अंतर्गत रस्याचे क्षेत्र ४७९.०० चौ.मी. असे एकुण १०५८.०० चौ.मी. क्षेत्र महानगरपालिकेस दुय्यम निंबंधक (नोंदणी) यांच्या कार्यालयात नोंदणी क्रमांक ०५५२५/२०१२ दि. ३०/०७/२०१२ अन्वये महानगरपालिका हक्कात हस्तांतर करुन दिलेले आहे. त्यांची नोंद ७/१२ उतारावर फेर क्रमांक १२६६ अन्वये घेऊन तसा ७/१२ उतारा सादर केलेला आहे. हे रस्ते सार्वजनिक रस्ते म्हणुन वापरात राहतील

०६. भूखंडामध्ये बांधकाम नियमाप्रमाणे या कार्यालयाची परवानगी घेऊन करण्यात यावे. तसेच करण्यात येणारे बांधकाम उपविधी (बिल्डींग बाय लॉज) व विकास नियंत्रण नियमावली (डेव्हलपमेंट कंट्रोल रुल) च्या अनुषंगाने करावे लागेल.

०७. भविष्यात रहदारीच्या दृष्टीकोणातून आणखी रस्ता रुंदीसाठी जागेची गरज भासल्यास ती भूमि संपादन कायदा आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतूदी नूसार संपादन करण्यांत येईल.

०८. तालुका निरीक्षक भूमी अभिलेख , औरंगाबाद यांना भूखंड आखणी करण्यासाठी पत्र जा.क्र/ मनपा/नरवि/ससंनर/२०१२/१०३२ दिनांक ०७/०५/२०१२ द्वारे कळविल्यानूसार त्यांनी प्रकरण क्रमांक मोर/अकृषि/अ.स/८८०/२०१२ मोजणी दिनांक २७/०९/२०१२ द्वारे भूखंड आखणी करुन तसा मोजणी नकाशा पूरविलेला आहे.

०९. भूखंडातून महानगरपालिकेच्या मालकीची जल वाहिनी किंवा भूमीगत गटार गेलेली असेल तर ते स्वखर्चाने स्थलांतर करुन घ्यावी लागेल. अशा जलवाहिनी, भूमिगत गटारावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.

पान क्रमांक २..

१०. नैसर्गिकरित्या वाहणारा पाण्याचा प्रवाह जर भूखंडातून जात असेल तर भूखंडाच्या एका बाजुने भुमिगत पाईप लाईन, गटारासाठी मार्ग मोकळा करुन दयावा लागेल. त्यासाठी कोणत्याही प्रकाराचा मोबदला दिला जाणार नाही. हे काम महानगरपालिकेच्या संबंधित विभागाच्या मार्गदर्शनानूसार करावे लागेल.

११. सदरील रेखांकनासाठी खालील प्रमाणे रक्कमेचा भरणा केलेला आहे. .

अ.क्र.	विवरण	भरणा केलेली रक्कम	पावती/चलन क्रमांक व दिनांक
०१.	जमिन विकास शुल्क	२,७६,४२०/-	१२९७७ दि. ३०/०४/२०१२
०२.	विकास खर्च	२९,२५,५००/-	२३९९६ दि. ३०/०४/२०१५

१२. सदर रेखांकनात महानगरपालिकेची सदर भागातील पाणी पुरवठा व जलनि:सारण योजना पूर्ण झाल्या खेरीज सदर भूखंडांना पाणी पुरवठा व जलनि:सारणाची व्यवस्था करण्यात येणार नाही.

१३. सदर रेखांकनासाठी महाराष्ट्र जमिन व महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये अकृषिक वापराची परवानगी मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडुन जा.क्र.२०१२/ मशाका/जमीन-१/एनएपी-३४/मौजे हिमायतनगर, औरंगाबाद/प्र.क्र.१७५, दिनांक २३/१०/१२ अन्वये प्राप्त आहे.

१४. मालकी हक्क, व जमीनीच्या हद्दी इत्यादी बाबत मा. न्यायालयात काही वाद उद्भवल्यास त्यांचे परस्पर निराकरण करावे लागेल त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. रेखांकनास विद्यमान पोच रस्त्याबाबत भविष्यात काही वाद उद्भवल्यास त्याची जबाबदारी रेखांकन धारकांची राहील, त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

तथापी उक्त आदेशात काहीही नमुद असलेतरी, स्थळावर या बदला कारणाने काही वाद उत्पन्न झाल्यास/ अथवा प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्यास, मोजणीनंतर भूखंडाच्या मोजमापात बदल घडुन असल्यास त्या अनुषंगाने मान्यतेचा पूर्वलक्षी प्रभावाने पूर्न:विचार करण्यात येईल व अशा परिस्थीतीत कार्यालयाचा झालेला निर्णय अंतिम राहील, याची नोंद घ्यावी.

मा. आयुक्त यांची मान्यता,
दिनांक. २६/०४/२०१२

सहाय्यक संचालक नगर रचना,
महानगरपालिका, औरंगाबाद.

प्रत :-

०१. मा. जिल्हाधिकारी , औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
०२. वॉर्ड अभियंता वॉर्ड **ब** महानगरपालिका, औरंगाबाद यांना माहितीस्तव
०३. मालमत्ता अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना अंतर्गत रस्ते, खुली जागा, विकास योजना रस्त्याखालील बाधीत क्षेत्र नोदणीकृत दस्ताने हस्तांतरीत झालेली आहे संबंधी माहितीस्तव.
०४. मुळ संचिकेसाठी.